जनहिताय सर्वदा

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**ग्राम विकास विभाग**

बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ, फोर्ट,मुंबई-४०० ००१.

**दूरध्वनी क्र**: ०२२--२२०१४४२० E-mail: usest१०.rdd-mh@nic.in

क्र.संकिर्ण-२०२३/प्र.क्र.२२७/आस्था-१० दि. ०३.१०.२०२४

प्रति,

सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद

**विषय:-** जिल्हा परिषदेतील विभागीय स्पर्धात्मक परिक्षेतील उमेदवारांना उत्तीर्ण होण्याकरिता समान गुण मर्यादा लागु करणेबाबत.

**संदर्भ:-** सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.प्रानिमं-१२२२/प्र.क्र.५४/का.१३-अ दि.०४.०५.२०२२

महोदय,

उपरोक्त विषयांनुसार सन २०२३ मध्ये राज्यातील विविध विधानसभा सदस्य आणि विधानपरिषद सदस्य यांच्याकडून प्राप्त निवेदनाद्वारे जिल्हा परिषदेत मर्यादित विभागीय स्पर्धात्मक परिक्षा उत्तीर्ण होण्याकरिता सर्वच उमेदवारांना शासन निर्णय सा.प्र.वि. दिनांक ०४.०५.२०२२ नुसार एकच गुणमर्यादा लागू करण्यात यावी. तसेच विभागीय आयुक्तांनी २०२३ मध्ये घेण्यात आलेल्या विभागीय स्पर्धात्मक परिक्षेच्या उत्तीर्ण होण्याचा समान ९० गुणांचा (एकूण गुणांच्या ४५ %) निर्णय लागू करावा व या निर्णयानुसार पात्र होत असलेल्या संबंधित उमेदवारांचा निवड यादीत समावेश करण्यात यावा, अशी महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद लिपिकवर्गीय कर्मचारी संघटना यांनी केलेल्या मागणीच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्याबाबत विनंती केली आहे.

२. उपरोक्त विनंतीच्या अनुषंगाने नमूद करण्यात येते की, सामान्य प्रशासन विभाग, दि.०४.०५.२०२२ रोजीचा शासन निर्णय सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना सुध्दा पृष्ठांकित केला असल्याने सदर शासन निर्णयातील परिच्छेद क्र.८(ब) तरतूदीनुसार जिल्हा परिषदेत मर्यादित विभागीय स्पर्धात्मक परिक्षा उत्तीर्ण होण्याकरिता जिल्हा परिषदेतील उमेदवारांना एकूण गुणांच्या किमान ४५ टक्के गुणमर्यादा लागू आहे. त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

आपला,

3/10/2024

(बा.ना.पाटील)

कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत:- १) सर्व विभागीय आयुक्त

२) आस्था-१० कार्यासन निवडनस्ती

c:\users\sima.belkhale\desktop\टिपनी २०२३\समान गुण मर्यादा.docx